| ३]सोनगांव — गोतेवस्ती | ५१० | ३] पिलन-वाडी | ३९४ | ३]मोहरी | २५५ | | --- | ३] लवळे | ४८२ | ३] कडदे | १०८ | ल.पा. | |
| | | | | ४]नांदगांव | २७३ | | ६३५ | ४]शेरे | १३१ | ४] गोदूंबे | ९६ | १३ | ३६१७ |
| ४]शिरवळी | ४९३ | | ९५९ | | ---- | | | ५] दारवली मुगवडे | ४२० | ५] धोंडिवळे | ३१९ | | |
| | ---- | | ---- | | ८७२ | ल.पा. | | | ---- | | ---- | | |
| | १३६६ | | | | | — | — | | | | १६२४ | | |
| | | | | ल.पा. | | | | | १३६० | | | | |
| ल.पा. | | ल.पा. | | १]नारायगांव देगांव | १६४ | | | | | ल.पा. | | | |
| — | — | — | — | | | | | ल.पा. | | — | — | | |
| | | | | | | | | १] रिहे | १८० | | | | |
| | | | | | | | | २] लवार्डे | ४८३ | | | | |
| | | | | | | | | ३] भूगांव | ५१६ | | | | |
| | | | | | | | | ४] उरावडे | ४५४ | | | | |
| | | | | | | | | | ---- | | | | |
| | | | | | | | | | १६३३ | | | | |
| एकूण ४ | १३६६ | ३ | ९५९ | ५ | १०३६ | २ | ६३५ | ९ | २९९३ | ५ | १६२४ | ५३ | १५६२६ |

## तक्ता क्रमांक ६

~~काम सुरु असून~~ व

१९८४-८५ पासून , प्रगतीपथावर असलेल्या कामाची तालुकानिहाय माहिती, संभाव्य सिंचन क्षमता

| खेड को.प./ल.पा. | सिंचन क्षमता है. | आंबेगाव को.प./ल.पा. | सिंचन क्षमता है. | जुन्नर को.प./ल.पा. | सिंचन क्षमता | शिरुर को.प./ल.पा. | सिंचन क्षमता | दौंड को.प./ल.पा. | सिंचन क्षमता | इंदापूर को.प./ल.पा | सिंचन क्षमता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| को.प. | — | को.प. | | को.प. | | को.प. | | को.प. | | को.प. | |
| | | १] चासनारोडी | ३८४ | १] पारुंडे | १७० | १] शिवतकार म्हाळुंगे | १५२८ | १] पाटेठाण | ८९६ | १] चिखली | ४९[illegible] |
| ल.पा. | | २] पारगांव | ८३६ | २] हिवरे | २८९ | २] निमगांव दुुदे | ६८३ | ] पाटेठाण | १०४८ | २] वालचंदनगर | ४०[illegible] |
| १] काळूस | ७२२ | ३] वळती | ४०६ | ६] ओतूर | २६१ | ३] कवठे [धाकटे] | १०४८ | | १९४४ | | ८९[illegible] |
| २] भोसे | ४०० | | १६२६ | | ७२० | | ३५२९ | ल.पा. | | | |
| ३] निघोजे | ६१३ | ल.पा. | | ल.पा. | | ल.पा. | — | — | — | | |
| ४] दोंदे | ८४५ | १] गोहे बु।। | १६४ | १] उच्छिल | ६९४ | | | | | | |
| ५] वरुडे | १६४ | | ---- | २] बल्लाळ-वाडी | १००९ | | | | | | |
| ६] निघोजे | ११७ | | ---- | ३] ओतूर - [वाघदरा] | १४० | | | | | | |
| | २८६१ | | | | १८४३ | | | | | | |
| एकूण ६ | २८६९ | ४ | १७९० | ९ | २५६३ | ३ | ३५२९ | १ | १९४४ | २ | ८९३ |

नकाशा क्र. ६ (39) पुढे चालू

| बारामती | | हवेली | | भोर | | मावळ | | मुळशी | | ()कु |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| को.प./ल.पा. | सिंचन क्षमता हे. | को.प./ल.पा. | सिंचन क्षमता हे. | को.प./ल.पा. | सिंचन क्षमता हे. | को.प./ल.पा | सिंचन क्षमता हे. | को.प./ल.पा | सिंचन क्षमता हे. | को.प. / ल.प. / सिंचन क्षमता हे |
| को.प. | | | | | | | | | | |
| १] पी-लीळे | ७३७ | को.प. | – | को.प. | | को.प. | | को.प. | | |
| २] मुरुम | ६७७ | ल.पा. | | १]आंबेघर | २२६ | १] राजपुरी अंमूल | ४२१ | १] कोळवण | ११३ | |
| ३] लाटे | ४३५ | १) नांदोशी | ३१२ | | | | | २] हिंजवडे | ७१९ | |
| ४] सोनगांव | १४१ | २) लोणी | १२४ | | | २]भोईर | २७९ | | ८३२ | |
| | | | | | | | ६५८ | | | |
| स्व. पा. — | — | | | स्व. पा. | — | ल.पा. | | स्व. पा. | — | |
| | | | | | | १]जाधववाडी | १६६० | | | |
| ४ | १९९० | २ | ४३६ | १ | २२६ | ३ | २३१८ | २ | ८३२ | ३४ / १९३८ |

## तक्ता क्रमांक ६ अ

पुणे जिल्हयात १.४.७४ ते ३१.३.८४ अखेर ... स्थानिक क्षेत्रात पूर्ण झालेल्या पाझर तलाव, बंधारे यांची तालुकानिहाय माहिती.

| अ.नं. | तालुका | कामाचे नांव [एम.आय.एन-६] पाझर तलाव | सिंचन क्षमता [हे] | बंधारे | सिंचन क्षमता [हे] | दारिद्र्य रेषेखालील शेतक-यांना शेतात खोदलेल्या विहिरींची संख्या १९८२-८३ | १९८३-८४ | मंजूर १९८४-८५ | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | हवेली | १८ | ८५३ | ३ | १४९ | २८ | २६ | १३ | [x]. बारामती तहसीलमध्यें "कासा" योजनेखाली पाझर तलावांचे काम करण्यात आले व तांडवे बांधण्याचे काम छोटे पाटबंधारे विभाग जिल्हा परिषदेकडे होते. |
| २. | खेड | ३ | २३० | २ | ३० | २८ | १९ | १३ | |
| ३. | आंबेगाव | ६ | २४२ | ९ | २५८ | २८ | १९ | २७ | |
| ४. | जुन्नर | ३ | ११० | ९ | २५८ | २६ | २५ | १० | |
| ५. | शिरुर | ४ | ८४ | ३ | ८१ | २८ | २५ | २४ | |
| ६ॻ | दौंड | ३ | २०१ | १ | २८ | २८ | १३ | २८ | |
| ७. | इंदापूर | ३४ | ४५१ | २ | ७४ | २७ | २५ | – | |
| ८. | बारामती | १४७ [x.] [तांडवे] | ४४१० | १ | २८ | २९ | २५ | २१ | |
| ९. | पुरंदर | २० | ७४० | ६ | ७५ | २९ | २२ | ३ | |
| १०. | भोर | – | – | ४ | १०० | – | – | – | |
| ११. | वेल्हे | – | – | २ | ३०० | – | – | – | |
| १२. | मुळशी | ३ | १९३ | १ | २० | २१ | २० | १३ | |
| १३. | मावळ | – | – | ४ | ६९ | – | – | – | |
| | एकूण | ९४ / १४७ | ७५९४ | ४७ | 1200 | 262 | 219 | 152 | |

## – फलोत्पादन –

फलोत्पादन विकास योजनेचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे अल्प व सिमांतक शेतकऱ्यांना फलोत्पादनातून अधिक उत्पादन मिळवून त्यांचे उत्पन्नांत वाढ करून त्यांना दारिद्रय रेषेच्या वर आणणे व त्यांची आर्थिक परिस्तिती सुधारावी हे होय. हे उद्दिष्ट समोर ठेवून महाराष्ट्र शासनाने फलोत्पादन विभाग स्वतंत्रपणे स्थापन केला. पुणे जिल्ह्यासाठी ही योजना सन १९८२–८३ पासून लागू करण्यांत आली.

फलोत्पादन विकासास जिल्ह्यात बराच वाव असल्यामुळे आणि जिल्ह्यातील निरनिराळ्या फळपिकाखालील क्षेत्र वाढविण्याचे दृष्टीने पुणे जिल्ह्यात फलोत्पादन विकासाच्या खालील योजना राबविण्यांत आल्या आहेत.

अ] अल्प व सिमांतक शेतकऱ्यांना फळपिक लागवडीसाठी भांडवली अनुदान

अल्प व सिमांतक शेतकऱ्यांना फळपिक लागवडीसाठी राष्ट्रीयकृत/भूविकास बँकाकडून कर्ज मिळवून देणे व त्यावर त्यांना हापूस आंब्यासाठी कर्जावर ५० टक्के अनुदान व आंबा [इतर सुधारित जात] नारळ, चिकू, पेरु, कागदी, लिंबू, मोसंबी, संत्रा, सिताफळ, व डाळिंब यासाठी ३३$\frac{1}{3}$ टक्के अनुदान देण्यात येते. बँकांनी दिलेल्या कर्जाचा बोजा कमी करणे हा अनुदानाचा उद्देश होय. अनुदान देण्यात येत असलेल्या फळझाडांचे सविस्तर कॅश फ्लो बँकांना त्यांच्या कर्ज धोरणांत मार्गदर्शन करण्याकरिता देण्यांत आले आहेत. ही कर्जे दिर्घ मुदतीची म्हणजे १५ वर्षाची असून कर्जफेड पिकांच्या फलधारणेच्या कालावधीप्रमाणे ५ ते ७ वर्षानंतर सुरु करण्यांत येते. या योजनेचा लाभ सन १९८२–८३ ते १९८४–८५ [डिसेंबर ८४] अखेर पर्यंत २७७ अल्पभूधारकांनी घेतला आहे. त्यांना एकूण रु. ५४०९४५ अनुदान देण्यांत आले व २०९.७४ हेक्टर क्षेत्र फळपिकाखाली आणण्यांत आले.

ब] घरकुलवासी शिवेवर राहणारे दुर्बल घटक, अनुसूचित जात व नवबौध्द फळरोपांचे मोफत वाटप :–

शासनातर्फे दुर्बल घटकांना घरकुल बांधून देण्यांत आली आहेत. अशा घरकुल वासीयांना व वेशीवर राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या व नवबौध्द लाभधारकांना त्यांच्या घराभोवती लावण्यासाठी जास्तीत जास्त ५ फळझाडे मोफत देण्याची योजना राबविण्यांत आली आहे. याचा उद्देश दुर्बल घटकांच्या उत्पन्नांत थोडीशी भर पडावी असा आहे. सन १९८२–८३ ते १९८४–८५ [डिसेंबर १९८४] अखेरपर्यंत एकूण ६७२० घरकुल वासीय व वेशीवर राहणाऱ्या दुर्बल घटकांना ३२३९९ झाडे १,५३,२७७ रुपयांची वाटण्यांत आली.

क] गांवठी आंबा व बोर झाडाचे चांगल्या जातीत रुपांतर

या योजनेखाली गांवठी आंबा व झाडांवर = बगल कलम करून रान बोरीवर डोळे भरून सुधारलेल्या जातीमध्यें रुपांतर करण्यांत येते. बगल कलम करणे, व डोळे भरणे यासाठी शेतक-यांना प्रत्यक्ष येणा-या खर्चावर प्रत्येक आंबा व बोर झाडांसाठी अनुक्रमे रु. ३ व रु. १/- चे अनुदान देण्यांत येते. ही योजना सन १९८३-८४ पासून पुणे जिल्हयांत राबविण्यात आली. सन १९८३-८४ व १९८४-८५ मध्ये एकूण २४८ लाभधारकांच्या ४६७३ आंब्यावर बगल कलम करण्यांत आले. व १४६ लाभधारकांच्या २६४३ बोरीवर डोळे भरण्यांत आले.

ड] अपारंपारिक फळपिकांचे संवर्धन व विकास योजना

पारंपारिक पिकाशिवाय, अपारंपारिक फळपिके घेण्यासाठी अल्प व सिमांतक शेतक-यांना प्रोत्साहन मिळावे व व्यापारी तत्वावर त्याची लागवड व्हावी या हेतूने ही योजना पुणे जिल्हयांत राबविण्यांत आली. नारळ, आंबा, अंजीर, अॅव्होकाजे, फाळसा, पॅशनफ्रूट, वेलची, चेरी, स्ट्रॉबेरीज, रामफळ या पिकांचा अपारंपारिक फळपिके म्हणून समाविष्ट करण्यात आली आहेत. याची लागवड करणा-या अल्प भूधारकांस ५० टक्के अनुदानावर जास्तीत जास्त रु. ४०/- पर्यंतची रोपे पुरविली जातात व त्यांना लागवडी बद्दल योग्य ते मार्गदर्शन केले जाते. या योजनेखाली सन १९८२-८३ ते १९८४-८५ [डिसेंबर १९८४ अखेर] ४६१ लाभधारकांना ३४८० नारळ, आंबा अंजीर यांची रोपे वाटण्यांत आली.

ड] अल्प व सिमांतक शेतक-यांचे शेतावर फळपिक लागवडीचा ठोस कार्यक्रम.

ही योजना सन १९८४-८५ पासून नव्याने सुरु करण्यांत आली. या योजनेनुसार प्रत्येक तालुक्यातून ४०० अल्पभूधारकांची निवड करावयाची व प्रत्येकांस २५ रुपयळ आंबा व २५ इतर फळपिकांची रोपे [उदा. नारळ, चिंच, बोर, जांभूळ, फणस, लिंबू, पपई, कवठ इ.] मोफत पुरवावयाची व त्याच्या लागवडीपर्यंतचा सर्व खर्च शासनाने करावयाचा आहे. यानुसार पुणे जिल्हयात डिसेंबर १९८४ अखेर ५६२१ अल्प भूधारकांचे शेतावर १,२०,६९२ फळपिकांच्या रोपांचो लागवड करण्यात आली आहे. [तक्ता क्र. ८]

फ] रोपवाटिकेची स्थापना

रोपवाटिका स्थापनेचा मुख्य उद्देश म्हणजे जातीवंत, खात्रीशीर

व उत्कृष्ठ दर्जाची कलमे/रोपे रोपवाटिकेवर तयार करणे व ती फळबाग लागवड करणाऱ्या अल्प व सिमातंक शेतकऱ्यांना रास्त भावात उपलब्ध करून देणे हा होय. या उद्देशाानच पुणे जिल्ह्यात एक जिल्हा मध्यवर्ती रोपवाटिका राजगुरूनगर, क्षेत्र १० हेक्टर व तालुका रोपवाटिका शिरूर, बारामती जुन्नर, व भुकूम क्षेत्र प्रत्येकी ५.०० हेक्टर या स्थापन करण्यांत आल्या आहेत. या रोपवाटिकेवर एकूण ७००१ आंबा, [हापूस], आंबा [इतर सुधारित जाती] नारळ, चिकू, पेरू, कागदी लिंबू, मोसंबी, संत्रा, सिताफळ व डाळिंब या फळपिकांचे मातृवृक्षांची व १०५५ इतरं [चिंच, बोर, आवळा, फणस, जांभूळ, पपई] मातृवृक्षाची लागवड करण्यांत आली आहे. याशिवाय रोपवाटिकेवर पॉटींग शेड, स्टोअर शेड, अवजारांची खोली, इत्यादिचे बांधकामे चालू असून पाणी पुरवठयाच्या योजनाही उदा. पाईपलाईन, पंपघर सुरु आहेत. तक्ता क्र. ७ मध्ये फळनिहाय उत्पादित केलेल्या कलमांची माहिती दिली आहे.

ज] भाजीपाला प्रोत्साहन योजना [माडा पॉकेट]

ही योजना केंद्र पुरस्कृत आहे. राजगुरूनगर तालुक्यातील २२ गांवे फक्त माडा पॉकेट खाली येतात. या गावातील आदिवासी घटकांना त्यांच्या घराभोवती भाजीपाला लागवडीसाठी भाजीपाला बियाणांचे रू. २.७५ किंमतीचे पाकीट मोफत देण्यांत येते. त्यामुळे त्यांना भाजीपाल लागवडीची आवड निर्माण होईल. त्यापासून त्यांना ... मदतही होऊ शकेल हा होय. यानुसार सन १९८३-८४ मध्ये रू. १०,०००/- किंमतीचे भाजीपाला बियाणे २१०० आदिवासी कुटूंबाना वाटण्यात आले.

## तक्ता नं. ७

पुणे जिल्ह्यातील रोपवाटिकामधील फळनिहाया उत्पादित करण्यात आलेली कलमे/रोपे

| अ. नं. | फळरोप वाटिकेचे नांव | क्षेत्र हेक्टॅर | रोपवाटिकेवर उत्पादित केलेली कलमे/रोपे. १९८२-८३ ते १९८४-८५ डिसेंबर अखेर एकूण | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आंबा हापूस | आंबा इतर | नारळ | चिकू | पेरु | का. लिंबू | सिताफळ | डाळींब | इतर | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १] | जिल्हा मध्यवर्ती फळरोप वाटिका राजगुरुनगर | १०.०० | ११५४ | ७५ | १२१६२ | ३७६२ | १९४१९ | ११४९५ | ६३३३ | ६४६९ | ४३७०८ | १०४५७७ |
| २] | तालुका रोपवाटिका शिरुर | ४.०० | – | – | २७०० | – | १५३८ | ५७२७ | ९०० | १७७० | ३२२७७ | ५१९१२ |
| ३] | तालुका रोपवाटिका जुन्नर | ४.०० | १९६ | – | – | – | – | ४१७५ | ३५१५ | – | १९११२ | २६९९८ |
| ४] | तालुका रोपवाटिका बारामती | ४.०० | – | – | १००० | – | – | २८०० | ७५ | २०० | ४५६१५ | ४९६२० |
| ५] | तालुका रोपवाटिका भूकूम | ४.०० | – | – | – | – | – | ४५३४ | १४८४ | – | ४२८८० | ४८८९८ |
| | एकूण | २६.०० | १३५० | ७५ | १५८६२ | ३७६२ | २०९५७ | २८७३१ | १२३०७ | ८४३९ | १९०५९२ | २८२०७५ |

तक्ता नं. ८

पुणे जिल्हयातील फलोत्पादन विकास कार्यक्रमाची प्रगती दर्शविणारा तक्ता

| अ.नं. | तालुक्याचे नांव | अल्प व सीमातंक शेतक-यांना भांडवली अनुदान | | | घरकुल व वेशीवर राहणारे अ.जा. व नवबुध्द | | आंबा बगल कलम | | बोरीचे डोळे भरणे | | अपारंपरिक पिकाची लागवड | | फलोत्पादनाचा शेजा कार्यक्रम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लाभधारक संख्या | क्षेत्र [हेक्टर] | अनुदान [रुपये | लाभधारक संख्या | वाटप केलेली रोपे | लाभधारक | झाडांची संख्या | लाभधारक | झाडांची संख्या | लाभधारक | कलमे/ रोपे | लाभधारक | रोपांची संख्या | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| १. | हवेली | ८ | ६.०६ | १२११२ | ६५६ | ३२६५ | १५ | १७२ | २२ | २५० | २ | १७ | १९९ | ३८६२ | |
| २. | राजगुरुनगर (खेड) | ९ | ८.०७ | २७९२५ | ५६३ | २१६१ | १० | ७१ | १८ | ६७ | ५ | ४५ | २५७ | ६२९९ | |
| ३. | आंबेगाव | २१ | ११.८५ | २२१३९ | २३६ | ११८० | ३१ | १२० | ४ | ६५ | १२० | ७९० | ९६४ | १३१२२ | |
| ४. | जुन्नर | १०४ | ८०.७९ | २४९०५७ | २८४ | १३८५ | १० | ६३१ | ९ | ५२६ | ६९ | ४३५ | ४४५ | ११६५० | |
| ५. | शिरुर | ६७ | ५७.२४ | ११९८२१ | ८६३ | ४१५६ | २५ | ३०० | ३२ | ७९७ | ५९ | ४२१ | ८३५ | २०१३० | |
| ६. | दौंड | २ | १.२० | १९९२ | ७२४ | ३४२५ | ८ | ९० | ७ | १८५ | २७ | २२९ | ३८५ | १२७९१ | |
| ७. | इंदापूर | ११ | ६.९० | ६१८४ | ८०९ | ३९८८ | — | — | ५ | ७८ | १०० | ९०० | ५४१ | १२९१२ | |
| ८. | बारामती | ७ | ७.८७ | ६१८९ | ८७३ | ४०६५ | — | — | — | — | ३७ | ३३३ | ७०४ | १७५९५ | |
| ९. | पुरंधर | ३ | १.३५ | १५९९ | ४४२ | ३१९५ | ४ | ५४ | ३० | १९९ | १९ | १२४ | ३९९ | ८९२२ | |
| १०. | भोर | ८ | ३.०० | ७२०९ | ५३७ | २६४० | ३७ | ३९२ | १ | ३ | १ | ८ | ९६ | ९८८ | |
| ११. | वेल्हे | २२ | १६.४० | ५७७१३ | २४९ | १२४५ | २४ | १७० | — | — | २ | १८ | ३२ | ७३० | |
| १२. | मुळशी | १५ | ८.७१ | २८९९५ | ३४६ | १७८० | ७४ | २४९३ | ९ | ३५६ | २० | १६० | ६६४ | ११०२१ | |
| १३. | मावळ | — | — | — | २०४ | ९१४ | — | — | ९ | ११७ | — | — | — | — | |
| | एकूण | २७७ | २०९.७४ | ५४०९४५ | ६७२० | ३२३९९ | २४८ | ४६०३ | १४६ | २६४३ | ४६१ | ३४८० | ५६२१ | १२०६३२ | |

२.४ पशुसंवर्धन

शेती बरोबर शेतीस पूरक व्यवसायात शेतक-यांनी आर्थिक लक्ष घालणे जरुरीचे आहे. उत्तम पशुधन शेतक-यांच्या उत्पन्नात भर घालते त्याकरिता पशुवैद्यकिय सेवा पुरविणे, विदेशी/स्थानिक पशुपक्षांच्या अनुवंशात सुधारणा घडवून सुधारित जातीच्या पैदाशीची सोय उपलब्ध करणे, त्याची निगा राखणे अशा दृष्टीने जिल्हयात पशु विकासाचे कार्यक्रम राबविले जातात.

जिल्हा नियोजन मंडळाच्या स्थापनेपूर्वी जिल्हयात एकूण १० पशु वैद्यकिय दवाखाने व ४७ उपचार केंद्रे होती. मंडळाच्या स्थापनेनंतर आता दवाखाने २१ व उपचार केंद्रे २८ झाली आहेत. [तक्ता क्र. ९] शेतक-यांना पशुवैद्यकिय सेवा ८ ते १० कि.मी.च्या परिसरात उपलब्ध करुन देण्याकरिता जिल्हा नियोजन मंडळाने सन ८३-८४ मध्ये प्रत्येक तालुक्यात २ याप्रमाणे करुन घेतले व ८ मदत केंद्राचा २६ पशु उपचार केंद्र स्थापन/दर्जा वाढवून दवाखान्यात रुपांतर करण्यात आले.

सुधारित जातीच्या पैदाशीच्या सोयी उपलब्ध करुन देण्याकरिता कृत्रिम रेतन केंद्रे स्थापन करुन संकरित जातीच्या गायींच्या पैदाशीचा कार्यक्रम राबविला जात आहे. जिल्हयामध्ये ५५ कृत्रिम रेतन केंद्रे आहेत. व ८४-८५ साली ४० गोठवण उपकेंद्रे निर्माण करण्यात आली आहेत. या शिवाय पशु वैद्यकिय सेवा देणा-या संस्थेमध्ये कृत्रिम रेतनाची सोय उपलब्ध आहे.

समाजातील अति दुर्बल व पतहिन, अल्प/अत्यल्प शेतकरी व शेत मजूर यांच्या उत्पन्नात भर घालण्यासाठी अशा लाभधारकांना मेंढयाचे १ युनिट अनुदानावर देण्यात येते. अेका युनिटमध्ये २० मेंढया व १ नर असतो. रु. ४ ते ५ हजार कर्ज दिले जाते व योजनेतून अल्प भूधारकाना २५ टक्के किंवा रु. १००० व अत्यल्प भूधारक व शेतमजूर यांना ३३$\frac{1}{3}$ टक्के अथवा रु. १३३३ अनुदान दिले जाते. सन ७७-७८ पासून ही योजना सुरु झाली व आतापर्यंत २२२७ लाभधारकांना फायदा झाला. मेंढया खरेदीसाठी रु. ७८.२६ लाख कर्ज उपलब्ध दिले व शासनामार्फत रु. २३.६० हजार /अनुदान देण्यात आले. केंद्र शासनाची ५० टक्के मदत या योजनेस मिळते. [तक्ता क्रमांक १०]

दुग्ध उत्पादनास प्रोत्साहन मिळून शेतक-यांना पूरक व्यवसाय उपलब्ध व्हावा या हेतूने ८४-८५ पासून 'गोकुळग्राम योजना' जिल्हयात सुरु करण्यात आली आहे. या योजनेत प्रत्येक पंचायत समितीतील किमान १ खेडे दत्तक घेणेत येते व अशाना गोकुळ असे नांव देणेत आले आहे. दत्तक

खेडयातील शेतक-यांना पशुसंवर्धन व दुग्ध उत्पादन या विषयात मार्गदर्शन करून दुध उत्पादन वाढविणे शक्य होणार आहे. या योजनेपूर्व ग्रामीण कुटूंबाना वर्षभर लाभदायक रोजगार मिळून त्यामुळे त्यांचा आर्थिक फायदा होईल. सुरुवातीस जिल्हयातील आंबेगाव व दौंड तालुक्यात सुरु झाली असून पुढील वर्षी उरलेल्या सर्व तालुक्यात ही योजना राबविली जाणार आहे.

: जिल्हा पशुसंवर्धन विभाग – जिल्हा परिषद पुणे – पशुवैद्यकिय दवाखाने/उपचार केंद्रे.
जि. नि. कि. म. स्थापनेपूर्वीचे

| अ.नं. | तालुका | १९७३–७४ पूर्वीचे दवाखाने | १९७३–७४ पूर्वीचे उपचार केंद्रे | एकूण | १९७४–७५ ते १९८३–८४ अखेर दवाखाने | १९७४–७५ ते १९८३–८४ अखेर उपचार केंद्रे | एकूण | एकूणएकंदर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हवेली | उरळीकांचन | खानापूर, लोणीकंद, मोशी. | ४ | खानापूर | खडकवाडी, पिंपरीसांडस, | ३ | ६ |
| २ | खेड | राजगुरुनगर | चाकण, वाडा, आळंदी, पाईट | ५ | चाकण, डेहणे, | कुडे बु. आंबोली | ४ | ८ |
| ३ | आंबेगाव | मंचर | धामणी, आंबेगाव | ३ | धामणी, तळेघर, डिंभे | कुरवंडी, बामोंडी | ५ | ७ |
| ४ | जुन्नर | जुन्नर | ओतूर, बेल्हा, मढ, पिंपळवंडी, इंगळून, खामगाव, पिंपळगाव [illegible], जोगा, आपटाळे | ९ | बेल्हा, मढ, पिंपळवंडी, आपटाळे. | पारुंडे | ५ | १० |
| ५ | शिरुर | तळेगाव ढमढेरे | शिरुर, न्हावरा, मांडवगण फराटा, टाकळी हाजी, जांबूत, वडगाव रासाई. | ७ | शिरुर, न्हावरा. | पिंपरखेड, मुखई. | ४ | ९ |
| ६ | दौण्ड | केडगाव | दौण्ड, यवत, मलठण, पाटस, राहू | ६ | दौण्ड | गलांडवाडी, रावणगाव, वरवंड. | ४ | ९ |
| ७ | इंदापूर | इंदापूर | भिगवण, लासुर्णे बावडा | ४ | भिगवण, बावडा | पळसदेव, उध्दट, निमसाखर | ५ | ९ |
| ८) | बारामती | — | सांगवी, लोणीभापकर, मुर्टी, सुपा | ४ | सांगवी, लोणीभा. काटेवाडी, शिर्सुफळ. | अंजनगाव, पारवडी | ६ | ८ |

कृपया पान २ पहा..

(४१) नकाशा क्र. २ — पुढे चालू

| अ.क्र. | तालुका | १९७३-७४ पूर्वीचे दवाखाने | उपचार केंद्रे | एकूण | १९७४-७५ ते १९८३-८४ अखेर दवाखाने | उपचार केंद्रे | एकूण | एकूणात |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९) | पुरंधर | सासवड | गराडे, राजेवाडी, परिंचे. | ४ | परिंचे | नायगांव, गुळुंचे | ३ | ६ |
| १०) | भोर | भोर | हिर्डोशी, किकवी | ३ | किकवी | हातवे बु. निगुडघर | ३ | ५ |
| ११) | वेल्हा | — | वेल्हा, पान्शेत | २ | वेल्हा | पासली, सोंडेसरपाले, रांजणी | ४ | ५ |
| १२) | मुळशी | — | पौड, मुठा, वाकड | ३ | — | शेडाणी, भांबर्डे | २ | ५ |
| १३) | मावळ | कामशेत | इंदूरी, वडेश्वर | ३ | — | जोवण, कार्ला | २ | ५ |
| | एकूण :- | १० | ४७ | ५७ | २२ | २८ | ५० | ९० |

टिप :- अधोरेखीत दवाखाने हे १९७४ पूर्वी जनावरांचे उपचार केंद्रे होती, त्यांचे दवाखान्यात रुपांतर करण्यात आलेले आहे.

## तक्ता क्रमांक १०

जिल्हा नियोजन व विकास मंडळ अस्तित्वात आल्यापासून मेंढीपालन कार्यक्रमाखाली लाभ मिळालेल्या लाभधारकांची तालुका निहाय यादी

| अ. नं. | तालुका | (कार्यक्रमाचे नांव/ परिमाण संख्या | ७७.७८ | ७८.७९ | ७९.८० | ८०.८१ | ८१.८२ | ८२.८३ | ८३.८४ | एकूण | अनुदान (कोटीत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ | १३ रु. |
| १. | हवेली | विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रम[मेंढीपालक] लाभार्थी संख्या | – | ५५ | ८४ | ४१ | ३७ | १३५ | ३८ | ३८० | ३.०० |
| २. | शिरूर | --"-- | – | ४१ | ८२ | १३७ | १०१ | ८० | २२ | ४६३ | ५.०० |
| ३. | दौंड | --"-- | – | ११ | ७५ | १८ | १४३ | ६७ | १४ | ३२८ | ३.५० |
| ४. | इंदापूर | --"-- | – | १६ | ६१ | ४६ | ४५ | ३५ | ५ | २०८ | २.२५ |
| ५. | बारामती | --"-- | १६ | ११४ | ७७ | १३६ | १२४ | ६६ | २४ | ५५७ | ६.४५ |
| ६. | पुरंदर | --"-- | – | ३५ | ३९ | ९१ | ५४ | ४२ | १६ | २७७ | ३.०० |
| ७. | भोर | --"-- | – | – | – | २ | – | – | २ | ४ | ०.४० |
| | एकूण | [illegible] लाभार्थी संख्या | १६ | २७२ | ४१८ | ४७१ | ५०४ | ४२५ | १२१ | २२२७ | रु.२३.६० |

## २.५ दुग्ध व्यवसाय विकास

जनतेस सकस व चांगल्या प्रतीचे दुध रास्त दरात पुरविणे, शेतकऱ्याना जोडधंदा उपलब्ध करून देऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे ही दोन उद्दिष्टे लक्षांत घेऊन दुग्धव्यवसाय विकास कार्यक्रम राबविला जातो.

पुणे जिल्हयात प्रतिदिनी २.६८ लाख लिटर दुध संकलित केले जाते. त्या पैकी १,१४०.०० लिटर दुध मुंबईस पाठविले जाते. सहकारी संस्थामार्फत दुग्ध शाळा विकास संघटन करणे हे शासनाचे धोरण असून या सहकारी संस्थानी आपल्या सभासद उत्पादकाकडून दुध संकलित करण्याची जबाबदारी स्विकारलेली आहे.

दुधाचे संकलन प्रमाण कमी असल्याने संबंधित सहकारी संस्थास नोकर वर्गाच्या नेमणूकीमुळे नुकसान सोसावे लागते. हे नुकसान भरून काढण्यासाठी शासनाकडून सहकारी संस्थास ३ वर्षाच्या कालावधीमध्ये रू.२५००/- चे अनुदान दिले जाते. गेल्या दहा वर्षात २४८ संस्थाना रू.२.५२ लाखाचे अनुदान देण्यात आलेले आहे. तसेच दुग्ध सहकारी संस्थाना वाहतुकीसाठी अनुदान, दुध हंडे व यंत्रसामुग्री खरेदी करणे, दुग्ध विकासासाठी चांगल्या जातीची वासरे पुरविणे, उच्च पैदास क्षमेतेच्या पारडयांचा पुरवठा करणे, भाकड गाभण म्हशींचा पुरवठा करणे इत्यादि विविध योजना शासनाच्या अर्थ सहाय्याने राबविले जातात. [सोबत तक्ता क्रमांक ११ जोडला आहे.]

## तक्ता क्रमांक ११

### पुणे जिल्ह्यात विविध योजनाद्वारे दुग्ध व्यवसाय विकास कार्यक्रमात झालेले साध्ये व खर्च

[ १.४.७४ ते ३१.३.८४ ]

[रुपये लाखात]

| अ.क्र. | योजना | परिमा | हवेली | खेड | आंबेगाव | जुन्नर | शिरूर | दौंड | इंदापूर | बारामती | पुरंदर | भोर | वेल्हे | मुळशी | मावळ | [illegible] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | [illegible] |
| १. | प्राथमिक दुग्ध संस्थाना | रू.लाख | १.९७ | 0.१८ | 0.१८ | 0.७९ | – | – | – | 0.0१ | | 0.६५ | – | – | – | ३. |
| | वाहतुक अनुदान | संस्था संख्या | १ | ६ | ३ | ११ | – | – | – | – | – | १ | – | – | – | २. |
| २. | प्राथमिक दुग्ध संस्थाना | रू.लाख | 0.१९ | 0.0८ | 0.२७ | 0.0६ | 0.२४ | 0.१५ | 0.३८ | 0.४६ | 0.१३ | 0.३५ | 0.0६ | 0.११ | 0.0४ | २. |
| | व्यवस्थापकीय अनुदान | संस्था सं. | १२ | ८ | २६ | ७ | २५ | १७ | ३७ | ५१ | १४ | ३७ | ५ | ११ | ५ | २ |
| ३. | दव्व पैदास क्षमतेच्या | रू.लाख | – | 0.४९ | 0.३२ | 0.२९ | 0.0८ | – | – | – | – | 0.0८ | – | 0.१४ | – | १ |
| | १ वर्षीय पारडयांचा पुरवठा | पारडया | – | ७९ | ४० | ४५ | १४ | – | – | – | – | १२ | – | २० | – | २ |
| ४. | पारडयासाठी खावटी अनुदान | रू. | – | 0.७२ | 0.९२ | 0.६५ | 0.0७ | – | 0.११ | – | – | 0.0२ | – | – | – | २. |
| ५. | भाकड गाभण म्हशींचा पुरवठा | रू. | – | 0.0६ | 0.११ | 0.१३ | – | – | – | – | – | 0.२२ | – | 0.७३ | – | 0. |
| | | संख्या | – | ८ | १० | ११ | – | – | – | – | – | १६ | – | ४७ | – | |
| ६. | दुभती जनावरे खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य | रू. | – | – | 0.२२ | 0.१६ | – | – | – | – | – | 0.१२ | – | 0.३८ | – | 0. |
| | | संख्या | – | – | १५ | ११ | – | – | – | – | – | ८ | – | १८ | – | ५ |

२.६. मत्स्यव्यवसाय

मत्स्योत्पादन वाढवून प्रथिनयुक्त अन्नाची वाढती गरज भागविणे आणि समाजाच्या दुर्बल घटकांत मोडणाऱ्या मच्छिमारांची आर्थिक, समाजिक उन्नती करणे हे मत्स्यव्यवसाय विकासाचे उद्दिष्ट आहे.

त्या दृष्टीने हडपसर ता. हवेली येथे मत्स्यबीज उत्पादन केंद्राची स्थापना करण्यात आली. सन १९७२ पासून ते केंद्र सुरु आहे. हडपसर येथील मत्स्यबीज उत्पादन केंद्रावर प्रतिवर्षी कटला, रोहू, मृगल, सिप्रीनस या जलदगतीने वाढणाऱ्या माशांच्या पिलांचे उत्पादन करून प्रतिवर्षी १ कोटी मत्स्यबीज निर्मितीचे लक्ष साध्य करून ही मत्स्यबीजे जिल्ह्यातील बारमाही पाटबंधारे तलावामध्ये साठवणूक करून मच्छिमारांना फायदा देण्यात येतो.

हडपसर येथील केंद्राच्या धर्तीवर पुढील पाच वर्षात आदिवासी विभागात माणिकडोह/येडगांव येथे मत्स्योत्पादन केंद्राचे बांधकाम करून तेथे सुधारित जातीचे मत्स्य पिल्ले निर्माण करून कुकडी प्रकल्पातील इतर जलाशयामध्ये सोडण्याची योजना आहे.

अधिक मत्स्योत्पादना बरोबरच मच्छिमार व्यवसायिकाना व्यावसायिक सोयी पुरविण्याच्या हेतूने त्यांना नौका खरेदी करणे, नायलॉन सूत खरेदी करणे त्यांच्या सहकारी संस्थाना आर्थिक सहाय्य करणे, अशा योजनासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते.

२.७ मृदसंधारण

जमिनीची योग्य मशागत करणे व तिचा कमाल उपयोग करून घेणे या बाबी अनेक गोष्टीवर अवलंबून असतात. जमिनीची बांधबंदिस्ती, मजगीकरण वनारोपण करून जमिनीची धूप थांबविणे इत्यादी उपायाद्वारे जमिनीचा विकास साधला जातो. बांध, बंदिस्ती, मजगीकरण इत्यादि उपायाद्वारे जमिनीची धूप थांबून जमिनीत ओलावा टिकून राहण्यास मदत होते. तसेच नालाबंडिंगमुळे विहिरींना पाणी वाढते ही कामे बव्हंशी रोजगार हमी योजनेतून घेतली जातात. सन ७४ पासून आतापर्यंत पुणे जिल्ह्यात १७१९ हेक्टर सपाटीकरण, ५५६ हेक्टर मजगीकरण झालेले आहे व ३८३८ नाला बंडिंगची कामे पूर्ण झाली आहेत.

कोरडवाहू जमीन क्षेत्रात पाणवहाळ[काउंटेप] विकासाचा नवीन कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे. या कार्यक्रमात वनारोपण, समोच्च बंदिस्ती, जमिनीची प्रतवारी इत्यादि कामे केली जातात. आतापर्यंत पुणे जिल्ह्यात २०० गावे या योजनेखाली निवडण्यात आली असून तेथे हा कार्यक्रम यशस्वीरित्या राबविला जात आहे.

## २.८ आयाकट व जलप्रदाय क्षेत्रविकास

मोठ्या व मध्यम पाटबंधारे प्रकल्पाद्वारे निर्माण झालेल्या अथवा निर्माण होणाऱ्या ओलित क्षेत्राच्या उपयोगित वाढ करणे हा आयाकट विकासाचा भाग आहे. हे काम जलप्रदाय क्षेत्र विकास प्राधिकारण करते. जलप्रदाय क्षेत्राखाली येणाऱ्या क्षेत्रातील भूविकासाचे काम कृषि खात्यामार्फत केले जाते. व ते प्रामुख्याने रोजगार हमी योजनेतून केले जाते.

पुणे जिल्हयात पवना प्रकल्पासाठी घोड व पवना लाभक्षेत्र प्राधिकरण असून त्याखाली मावळ मुळशी व हवेली तालुक्यातील क्षेत्र येते. तसेच कुकडी प्रकल्पाखाली जुन्नर, शिरूर व आंबेगाव तालुक्यातील क्षेत्र येते. हे प्राधिकरण नगर येथे आहे. लाभक्षेत्रातील जमिनी समतल करणे, उपकालव्यांच्या वितरिकांच्या तोंडापासून शेतापर्यंत चाऱ्या घालणे ही कामे "कडा" योजनेत केली जातात. जलप्रदाय क्षेत्र विकास प्राधिकरणामार्फत शेतकऱ्यांना आवश्यक असणाऱ्या सर्वच सोयी एकत्रित मिळतात. सहकारी संस्था, बी, बीयाणे, खते इत्यादि पाणी इत्यादी शेतकऱ्यांना विनासायास उपलब्ध एकाच ठिकाणी उपलब्ध एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावे या हेतूने प्राधिकारणाची निर्मिती करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादनाला बाजार पेठ उपलब्ध व्हावी व ती विनाविलंब व्हावी या हेतूने बाजार पेठा निर्माण करण्याचा उद्देश आहे. तसेच बाजारपेठेत उत्पादित माल त्वरित पोहोचविला जावा म्हणून प्राधिकरण कक्षेतील रस्त्यांचे कामही केले जाते. पवना लाभक्षेत्रात ८ रस्त्यांचे काम हाती घेण्यात आलेले आहे. एकूण लांबी ६३ कि.मी. असून त्यापैकी ४७ कि.मी. रस्त्यांचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. या कामावर आतापर्यंत रू.६८ लाख खर्च झालेली असून हे काम पूर्ण करण्यासाठी रु.५०.०० लाखची आवश्यकता आहे.

## २.९ वने

जमिनीची धूप थांबविणे व वनसंपत्तीत वाढ करणे या राष्ट्रीय महत्वाच्या उद्देशाने वनविभागाच्या योजना राबविल्या जातात. निकृष्ठ असलेल्या वनक्षेत्रात मृदसंधारण करून त्यात लागवड करून जंगलाची वाढ करणे ही योजना प्रामुख्याने पुणे जिल्हयाच्या पश्चिमेच्या तालुक्यात राबविली जाते. छोट्या उद्योगधंद्याच्या उत्पादनास उपयुक्त ठरणाऱ्या हिरडा व घायपात या सारख्या वस्तूंच्या उत्पादनाचा विकास करण्याची योजना वनविभागामार्फत राबविली जाते. हिरडयाचा कातडी कातडी कमविणे व रंग तयार करण्याच्या उद्योगाकरिता उपयोग होतो. घायतापासून दोरखंड बनविण्यात येतात.

## २.१० सामाजिक वनीकरण

लोकसंख्या वाढीमुळे शेतीसाठी जमिनीची मागणी वाढली आहे, त्यामुळे जंगलवाढीकरीता जादा जमिन उपलब्ध होणे अशक्य आहे. तथापी इमारती लाकूड, सरपण, जनावरांसाठी चारा, गवत आणि इतर औद्योगिक अथवा औषधी उत्पादनांचे बाबतीतील वनांचे महत्व अनन्य साधारण आहे. वेगवेगळ्या विकास योजनांपूर्व वनसंपत्तीवरील ताण ब-याच पटीने वाढला आहे. वाढलेल्या मागणी प्रमाणे सध्या अस्तित्वात असलेल्या वनातून पुरवठा करणे कठिण असल्यामुळे मागणी व पुरवठयामधील तफावत दिवसेंदिवस वाढत आहे. काही प्रमाणात ही तफावत भरुन काढण्यासाठी शासकीय वन जमिनीखेरीज उपलब्ध असलेल्या जमिनीवर वृक्ष लागवडीखालील क्षेत्र वाढविणे अपरिहार्य आहे.

सामाजिक वनीकरण म्हणजे समाजाने, समाजासाठी राबवणेचा वनीकरणाचा कार्यक्रम होय. यासाठी समाजातील सर्व स्तरावरील घटकांचे स्वयंभू सहकार्य अपेक्षित आहे.

मुख्यत: ग्रामीण भागात इंधनाची जनावरांच्या चा-यांची आणि किरकोळ इमारती लाकडाची गरज भागविण्याच्या दृष्टीने खाजगी क्षेत्रातही वृक्ष लागवड होणे गरजेचे आहे. शेतकरी वनोपजांच्या गरजाचे बाबतीत स्वावलंबी होण्याचे दृष्टीने आवश्यक ते वृक्ष लागवडीचे तांत्रिक ज्ञान पुरविणे, वृक्ष लागवडीसाठी उद्युक्त करणे, रोपे व खते विस्तारसेवा माध्यमातून पुरविणे हे सामाजिक वनीकरणाचे प्रमुख अंग आहे.

सन १९८३-८४ मध्ये पुणे जिल्हयात सामाजिक वनीकरण विभागातर्फे वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. त्यावर्षी २८.९९ लाख रोपांची लागवड करण्यांत आली. शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, यांचे मदतीने हा कार्यक्रम राबविण्यात आला.

आर्थिक दृष्टया मागासलेल्या ग्रामीण जनतेच्या विशेषत: अनु.जाती व जमातीच्या मालकीच्या जमिनीवर फळझाडे लावून त्यांच्या आर्थिक उत्पन्नात भर टाकण्याच्या दृष्टीने ८५६ मागासवर्गीय कुटूंबाना फळझाडांची ४२८० रोपे विनामुल्य वाटण्यात आली.

शाळकरी मुलात वृक्षप्रेम वाढीस लागण्याचे दृष्टीने त्यांचेकडूनच वृक्ष लागवडीची योजना १९८१-८२ पासून सुरु करण्यात आली. ८३-८४ मध्ये ८५ शाळातील ८५०० विद्यार्थ्यांकडून १४८५४ रोपांची लागवड करण्यात आली.

ग्रामीण भागात सरपणाचे दुर्भिक्ष तीव्रतेने जाणवूं लागले आहे. त्यावर मात करण्याचे उद्देशाने भारत सरकारने ग्रामीण भागात जळाऊ लाकडाची लागवड ही ८०.८१ पासून सुरु केली. १९८३-८४ पासून पुणे जिल्हयात ही योजना राबविली जात असून १२२ हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आणण्यात आले आहे. सामाजिक वनीकरण प्रकल्प यू.एस.आय.डी.च्या सहाय्याने राबविण्यात येत

आहे. येत्या ५ वर्षात जिल्ह्यात २०० ग्रामपंचायतीचे क्षेत्रात ३००० हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आणण्याचा कार्यक्रम आहे. त्यास अनुसरून ८३-८४ मध्ये २० गावांची निवड करण्यात येऊन त्यात शेतक-यांना विनामुल्य रोपे पुरविणे, विस्तार सेवा, तांत्रिक मार्गदर्शन इत्यादि कार्यक्रम घेतलेले आहेत. सोबत सामाजिक वनीकरण राबविण्यात आलेल्या प्रमुख योजनांची तालुकानिहाय माहिती तक्ता क्रमांक १२ मध्ये दिली आहे.

## तक्ता क्रमांक ११

### सामाजिक वनीकरण योजनांतर्गत ३१ मार्च ८४ अखेर झालेले काम व प्रत्यक्ष खर्च

| अ.क्र. | योजनेचे नांव | परिमाण | हवेली | खेड | आंबेगाव | जुन्नर | शिरुर | दौंड | इंदापुर | बारामती | पुरंदर | भोर | वेल्हा | मुळशी | मावळ | पुणे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रस्त्याचे कडेने झाडे लावणे | कि.मी. लागवड [क्षेत्र] | २४ | – | – | – | – | ७५ | १८ | – | ७० | – | – | – | ४६ | १८ | ३३० |
| | | खर्च [रु. लाख] | २.४९ | – | – | – | – | ८.३३ | १०.९१ | – | ७.७६ | – | | – | ४.९० | २.११ | ३६.४७ |
| २. | सामाजिक वनीकरण प्रकल्प | वृक्ष लागवड [क्षेत्र हेक्टर | – | २५ | ११ | ३१ | २३ | – | २२ | – | – | २८ | ३४ | – | ३७ | – | २११ |
| | | खर्च रु. लाख | – | ०.३५ | ०.१६ | ०.४४ | ०.३३ | – | ०.३१ | – | – | ०.४० | ०.४८ | | ०.५३ | | ३.०० |
| ३. | शेतमजूरांकडून कॅनॉलचे बाजूने लागवड | लागवड क्षेत्र हेक्टर | – | – | – | – | – | ६ | ३ | – | – | | | | – | | ९ |
| | | खर्च | – | – | – | – | – | ०.०२ | ०.०७ | – | – | | | | | | ०.०९ |
| ४. | ग्रामीण भागात जळाऊ लाकडासाठी लागवड. | लागवड क्षेत्र हेक्टर | १२ | ८ | – | – | – | २० | ४१ | – | ४० | – | | – | – | – | १२२ |
| | | खर्च | ०.१३ | ०.०९ | – | – | – | ०.२२ | ०.४५ | – | ०.४४ | – | | – | ०.०१ | – | १.३४ |

२.११ [ अ ] एकात्मिक ग्रामीण विकास

या कार्यक्रमाचे उद्दीष्ट ज्या कुटूंबाचे निव्वळ वार्षिक उत्पन्न रू. ३५००/- एवढे आहे, अशा दारिद्र्य रेषेखालील ग्रामीण कुटूंबाना उत्पादक व्यवसाय अगर उत्पन्न देणारे व्यवसाय उपलब्ध करून देणे हे आहे. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाखाली अल्प-भूधारक, सीमांतिक शेतकरी, शेत मजूर, बिगर शेतमजूर, ग्रामीण कारागीर अनुसूचीत जाती व जमाती यांच्या कुटूंबाचा समावेश होतो. हया कुटूंबाची प्राप्ती पातळी वाढविणे हे उद्दिष्ट आहे. या कार्यक्रमासाठी लागणाऱ्या कर्जाच्या पतपुरवठा करणे आणि हया कुटूंबाना सुरळीत सहाय्यिक सेवा मिळण्यासाठी पाठपुरावा करणे यासाठी उत्पादक कार्यक्रम राबविण्यात येतो.

एकात्मिक ग्रामीण विकास प्रकल्प हा वैयक्तिक लाभधारकांसाठी कार्यक्रम आहे. त्यात खालील योजनांचा समावेश होतो.

१] शासकीय लघुसिंचन योजनेची कामे-विहिरी खोल करणे, तसेच जुन्या विहिरी, रहाट, डिझेल इंजिन पंपसंच, इले. मोटार इ.

२] पाणी न लागलेल्या विहिरीसाठी अर्थसहाय्य.

३] कृषि बियाणे/अवजारे/साठवणपात्रे शेती विषयक प्रात्यक्षिके.

४] भूविकास/मृदसंधारण

५] दुभत्या गुरांचे वितरण.

६] कालवडीच्या मिश्र पैदाशीसाठी विशेष योजना आणि कोंबडया, बकऱ्या, मेंढया व वराह आदि इतर पशुधन पैदास कार्यक्रम.

७] मेंढया, बकऱ्या, वराह, कोंबडया आदिंचे वितरण

८] शेतीचे बैल/बैलगाडया पुरविणे

९] फळबागायतीसाठी व्यक्तिगत शेतक-यांस जमीन सारखी करणे, खड्डा खणणे अवजारे यासाठी अर्थसाहाय्य देणे.

१०] जाळी व बोटी वगैरेसारख्या मत्स्यव्यवसाय कार्यक्रमाखाली अर्थसहाय्य देणे

११] ग्रामीण तरुण आणि कारागिर यांना ग्रामीण उद्योग सेवा, व व्यवहार याबद्दल प्रशिक्षण व मदत देणे.

प्रत्येक तालुक्यासाठी रू. ८.०० लाखाची तरतूद असून त्यातील ५० टक्के केंद्र शासनाचा भाग आहे.

योजना सुरु झाल्यापासून [१९८०-८१ ते ८३-८४] या योजनेचा ३० हजार लोकांना लाभ मिळाला असून त्यापैकी ६९३१ अनु.जाती, २४०८ अनु. जमाती यांचा समावेश आहे. एकूण अनुदान रू. ३.६१ कोटी देण्यात आलेले आहे. [सोबत तक्ता क्र. १३ व १४ ] मध्ये लाभार्थी व दिलेल्या अनुदानाची तालुकानिहाय माहिती दिली आहे.

## तक्ता क्रमांक १३

### एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाखाली लाभार्थींना दिलेले कर्ज व अनुदान दर्शविणारा तालुकानिहाय तक्ता

[रुपये लाखात]

| अ.नं. | तालुका | वर्षे | लाभार्थी ऐकूण | पैकी अ. जमाती | पैकी अ. जमाती | अनुदान | कर्ज. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | आंबेगाव | १९८०.८१ | ५९१ | – | – | ५.०१ | – |
| | | १९८१.८२ | ४१९ | – | – | ६.०६ | – |
| | | १९८२.८३ | ७२१ | १२७ | १०४ | ८.०५ | १८.१२ |
| | | १९८३.८४ | ७२१ | २११ | ११३ | ९.६९ | २८.७९ |
| २. | बारामती | १९८०.८१ | २२७ | – | – | ५.०२ | – |
| | | १९८१.८२ | ६६३ | – | – | ७.७६ | – |
| | | १९८२.८३ | ७०६ | २६६ | १६ | ८.०५ | २०.१२ |
| | | १९८३.८४ | ६४१ | २४६ | ३२ | ८.५३ | २९.१५ |
| ३. | भोर | १९८०.८१ | १७३ | – | – | ३.६१ | – |
| | | १९८१.८२ | १७८ | – | – | ६.९६ | – |
| | | १९८२.८३ | ६५८ | ११३ | १८ | ८.०३ | २०.७५ |
| | | १९८३.८४ | ६६२ | १३० | ४७ | १०.१८ | ३०.३० |

तक्ता १३ पुढे चालू.



| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | दौंड | १९८०.८१ | ३०५ | – | – | ५.०० | – |
| | | १९८१.८२ | ५६० | – | – | ६.१३ | – |
| | | १९८२.८३ | ७५८ | २५८ | – | ८.२८ | २०.३७ |
| | | १९८३.८४ | ७५६ | २५६ | ५२ | ९.५५ | २६.४७ |
| ५. | हवेली | १९८०.८१ | ६५२ | – | – | १०.०० | – |
| | | १९८१.८२ | ६०२ | – | – | ६.१२ | – |
| | | १९८२.८३ | ६६० | १४७ | ७० | ८.१६ | २०.५० |
| | | १९८३.८४ | ८४५ | २६१ | ५१ | १२.२३ | ३७.०६ |
| ६. | इंदापूर | १९८०.८१ | ४३४ | – | – | १०.०० | – |
| | | १९८१.८२ | ७८८ | – | – | ६.४७ | – |
| | | १९८२.८३ | ६०७ | २५२ | – | ८.२६ | २०.६२ |
| | | १९८३.८४ | ६९२ | २६७ | १५ | ९.३४ | ३१.७७ |
| ७. | जुन्नर | १९८०.८१ | ४२० | – | – | २.६३ | – |
| | | १९८१.८२ | ७१२ | – | – | ६.१० | – |
| | | १९८२.८३ | ७२५ | १३४ | १७४ | ९.८९ | २०.७० |
| | | १९८३.८४ | १००० | २२६ | ३१० | ९.९५ | ३१.४७ |

नकला १३ पुढे चालू

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८. | खेड | १९८०.८१ | १९७ | – | – | ३.६७ | – |
| | | १९८१.८२ | ४४१ | – | – | ६.३० | – |
| | | १९८२.८३ | ७७५ | १३५ | १८९ | ८.५८ | १९.४५ |
| | | १९८३.८४ | ८३४ | २२७ | १४५ | १०.३५ | ३१.१८ |
| . | मावळ | १९८०.८१ | २८६ | – | – | १.३४ | – |
| | | १९८१.८२ | ६०६ | – | – | ५.५९ | – |
| | | १९८२.८३ | ७५८ | २४३ | ८१ | ११.७१ | २३.०३ |
| | | १९८३.८४ | ७५० | २१४ | १५२ | १०.२४ | २७.५८ |
| १०. | मुळशी | १९८०.८१ | ३३८ | – | – | २.०३ | – |
| | | १९८१.८२ | ७४६ | – | – | ३.७४ | – |
| | | १९८२.८३ | ४०३ | ८१ | २२ | ५.४४ | १३.५७ |
| | | १९८३.८४ | ६६० | १५४ | ६४ | ९.०३ | २६.०३ |
| ११. | पुरंधर | १९८०.८१ | ४०२ | – | – | ५.०० | – |
| | | १९८१.८२ | १८२ | – | – | ४.२३ | – |
| | | १९८२.८३ | ७८७ | १७२ | ६३ | ८.३१ | १९.७७ |
| | | १९८३.८४ | ९८१ | ३३७ | ३३ | ९.२१ | २५.६९ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२. | शिरुर | १९८०.८१ | ३७९ | – | – | ५.०० | – |
| | | १९८१.८२ | ४२४ | – | – | ६.६४ | – |
| | | १९८२.८३ | ७१६ | १७६ | ६४ | ८.१७ | २०.४२ |
| | | १९८३.८४ | ८७६ | २८५ | ७१ | ९.३३ | २५.२० |
| १३. | वेल्हे | १९८०.८१ | ५८ | – | – | ०.७४ | – |
| | | १९८१.८२ | ५२१ | – | – | ६.०४ | – |
| | | १९८२.८३ | ४९४ | ८० | ३८ | ५.५८ | १३.९२ |
| | | १९८३.८४ | ५७६ | १३२ | १६ | ७.८७ | २१.४९ |
| १४. | एकूण | १९८०.८१ | ४४५६ | ४७५ | १४४ | ५०.०५ | २६०.०७ |
| | | १९८१.८२ | ६८४२ | १३३६ | ३२४ | ७७.८४ | २०८.४८ |
| | | १९८२.८३ | ८७६८ | २१७४ | ८३९ | १०६.५१ | २५१.३४ |
| | | १९८३.८४ | ९९९४ | २९४६ | ११०१ | १२५.५० | ३७२.१९ |
| | एकूण | ३०,०६० | ६९३१ | २४०८ | ३६८.९० | १०९२.०८ | |

टीप : १९८०-८१ व ८१-८२ च्या वर्षामधील कर्ज पुरवठ्याचे तालुकानिहाय आकडे उपलब्ध झाले नाहीत.

तक्ता क्रमांक १४

योजनानिहाय लाभार्थी संख्या, जिल्हा पुणे

| वर्ष | दुभती जनावरे | सिंचन/ लघु पाटबंधारे | ऑईल इंजिन इले. मोटार. | शेती सुधारणा | कुक्कुट पालन | इतर | ग्रामीण कारागिरांना मदत | सेवा व व्यापार | स्वयंरोजगार प्रशिक्षण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९८०-८१ | २१९४ | ९७६ | - | ९४ | - | ९३७ | २५४ | - | १८९ |
| १९८१-८२ | २३०५ | ११४४ | - | १४८ | - | १८४५ | ५५६ | ६४० | २०५ |
| १९८२-८३ | ३३४२ | ४८१ | ९२ | १७२ | १४ | २२५६ | ८५३ | १४५८ | ६४४ |
| १९८३-८४ | २१०५ | ८८९८ | १३५ | ९१ | ३२ | २७५१ | ११७४ | २२०८ | ४१७ |

टिप :- इतर या सदरात शेळ्या-मेंढ्या खरेदी, दुग्ध सहकारी संस्थाना अनुदान, बैलजोडी व बैलगाडी खरेदी इत्यादि योजनांचा समावेश आहे.

## [ड] राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम –

ग्रामीण भागाच्या प्राथमिक गरजा भागविण्यासाठी ग्रामीण भागात जादा रोजगार निर्माण करणे व शाश्वत मालमत्ता निर्माण करणे, ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावणे. ग्रामीण भागातील अर्ध बेकारांना व बेकारांना [पुरुष व स्त्रिया] रोजगार पुरविणे ही उद्दिष्टे आहेत. हा कार्यक्रम जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे कार्यान्वीत करण्याकरिता दिला आहे. या कार्यक्रमात ५० टक्के मदत केंद्र शासनाची मिळते.

ग्रामीण भागात कामे मंजूरीचे अधिकार पंचयात समितीस देण्यात आले आहेत. ग्रामपंचायतीने सुचविलेले काम समितीने १ महिन्यात मंजूरी न दिल्यास मंजूरीचे अधिकार जिल्हा ग्रामीण संस्थेस देण्यात आलेले आहेत. आता ग्रामपंचायतीस खाली दर्शविल्याप्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणात अनुदान मिळते.

| अ. नं. | लोकसंख्या | उपलब्ध होणारे अनुदान | |
|---|---|---|---|
| १. | १ ते १००० | रु. | ६००० |
| २. | १००१ ते २००० | रु. | ६८३९ |
| ३. | २००१ ते ३५०० | रु. | १०६२५ |
| ४. | ३५०१ ते ५००० | रु. | १३०६१ |
| ५. | ५००१ ते ७५०० | रु. | १४३५७ |
| ६. | ७५०१ ते १०,००० | रु. | १६००० |
| ७. | १०००० चे वर | रु. | २१३३३ |

जिल्ह्यात एकूण ११५२ ग्रामपंचायती असून सर्व ग्रामपंचायतीची कामे मंजूर झालेली आहेत. जिल्ह्यात एकूण १७४७ कामे डिसेंबर ८४ अखेर मंजूर झाली असून ७४८ कामे पूर्ण झालेली आहेत. व ९५९ कामे प्रगतीपथावर आहेत. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रमाखाली झालेल्या कामांची तालुकानिहाय माहिती तक्ता क्र. १५ मध्ये दिली आहे.

## तक्ता क्रमांक १५

## राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना

### तालुकानिहाय व वर्षनिहाय मंजूर कामे दर्शविणारा तक्ता

| अ.नं. | तालुका | ग्रामपंचायत संख्या | मंजूर कामाची संख्या | | | | डिसेंबर ८४ अखेर पूर्ण कामाची संख्या | प्रगतीपथावरील कामांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १९८२-८३ | १९८३-८४ | १९८४-८५ | एकूण | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | हवेली | ११७ | ६९ | ४४ | ७८ | १९१ | ७२ | ११९ |
| २. | खेड | १३० | ४१ | ८९ | २२ | १५२ | ५३ | ९९ |
| ३. | आंबेगाव | ७४ | ४५ | २९ | ३५ | १०९ | ४१ | ६८ |
| ४. | जुन्नर | १२५ | ६९ | ५६ | ३० | १५५ | ७३ | ८२ |
| ५. | शिरुर | ८२ | ४२ | ८३ | ६१ | १८६ | ९६ | ९० |
| ६. | दौंड | ६६ | ४१ | ५२ | ३८ | १३१ | ६२ | ६९ |
| ७. | इंदापूर | ९० | ६३ | २७ | ५ | ९५ | ५० | ४५ |
| ८. | बारामती | ७० | ६४ | — | ७० | १३४ | ४५ | ८९ |
| ९. | पुरंदर | ७८ | २२ | ५६ | ४७ | १२५ | ५० | ७५ |
| १०. | भोर | ११६ | ६८ | ४३ | ६९ | १८० | ५५ | १२५ |
| ११. | वेल्हे | ४९ | ४७ | १ | ३४ | ८२ | ३३ | ४९ |
| १२. | मुळशी | ९१ | ७० | १४ | १८ | १०२ | ५७ | ४५ |
| १३. | मावळ | ६४ | २१ | ४३ | ४१ | १०५ | ६१ | ४४ |
| | एकूण | ११५२ | ६६२ | ५३७ | ५४८ | १७४७ | ७४८ | ९९९ |

३.१

# प्रकरण ३

## सहकार

कृषि व औद्योगिक विकासाच्या वाटचालीमध्ये सहकाराचे महत्त्व अगण्य आहे. सहकारी चळवळीस शासनाने प्रथमपासूनच चालना दिलेली असून ती चळवळ यशस्वी व्हावी यासाठी आवश्यक त्या कायद्याची तरतूद शासनाने केलेली आहे.

सहकारी संस्थेच्या नोंदणीपासून तो अशा संस्था उर्जितावस्थेत आणणे साठी त्यांना विविध प्रकारे आर्थिक सहाय्य देते. खाजगी संस्थाबरोबर होणारी स्पर्धा टाळण्यासाठी त्याना संरक्षण हि दिले जाते.

पुणे जिल्ह्यात विविध योजना राबविल्या जातात. त्यातील प्रमुख अशा

१] विशेष घटक योजना.

अनु. जाती व नवबौध्द लोकांना ग्राहक संस्थेचे सभासद होणेसाठी व खावटीसाठी शासन कर्ज देते. त्यामुळे अशा लोकाना जीवनोपयोगी वस्तू रास्त भावात मिळू शकतात. तसेच त्यांना बिनव्याजी कर्जहि दिले जाते. त्यामुळे अनु. जाती व नवबौध्दाना आपले जीवनमानउंच उंचावण्यास मदत होते. आतापर्यंत २१६० सभासदाना रू. ५१२३ लाख रु. अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे.

२] बलुतेदार संस्था :- ग्रामीण पातळीवरील कारागिराना कामे मिळवून देणे व त्यांच्या मालाला योग्य भाव मिळावा या हेतूने अशा संस्था स्थापण्यात आलेल्या आहेत. या संस्थाना त्यांची कर्ज उचलण्याची क्षमता वाढविणेसाठी भाग भांडवलाच्या स्वरूपात अर्थसहाय्य दिले जाते. ८३.८४ अखेर १३ बलुतेदार संस्थाना रू. १३.६५ लाख रू. चे अर्थसहाय्य देण्यात आले.

३] औद्योगिक सहकारी संस्था :- कमी भांडवलात भरपूर प्रमाणात फायदेशीर कामकाज सभासदाना मिळते. लघु उद्योग व हस्तव्यवसाय या संस्थामुळे उत्तेजन मिळते. सभासद कारागिरांच्या मालाची योग्य विक्री संस्थेमार्फत केली जाते. त्यामुळे दलालासारख्या मध्यस्थांना पायबंद बसून कारागिरास योग्य मोबदला मिळतो. सुमारे ६० औद्योगिक संस्थाना १९.४२ लाख रूपयाचे आर्थिक सहाय्य मार्च ८४ अखेर देण्यात आले आहे.

४] सहकारी साखर कारखाने :- पुणे जिल्ह्यात साखर कारखान्यांची निर्मिती व वाढ होण्यात सहकाराचा मोठा वाटा आहे. जिल्ह्यात एकूण ६ सहकारी साखर कारखाने आहेत. साखर कारखान्याच्या उभारणीच्या खर्चात वाढ झाल्यामुळे कर्ज व भागभांडवल यांचे प्रमाण ६०/४० असे सुधारण्यात आले. या आकृतिबंधानुसार सन ७४.७५ पासून जिल्ह्यात नव्याने उभारण्यात आलेल्या साखर कारखान्याना पुढील प्रमाणे सहाय्य करण्यात आले.

सहकारी साखर कारखाने यांना मिळालेल्या शासकीय भाग-भांडवल व कर्ज यांचा तपशील.

| अ.नं. | तपशील | भीमा सहकारी साखर कारखाना मु.पाटस ता.दौंड | विघ्नहर सहकारी साखर कारखाना जुन्नर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| [१] | भाग भांडवल | | |
| | अ] शासनाचे भागभांडवल | १२३.५० | २०१.२५ |
| | ब] राष्ट्रीय सहकारी विकास मंडळाचे सहाय्य | ५३.५० | ८३.७५ |
| [२] | कर्ज | | |
| | अ] ६० टक्के दीर्घ मुदतीचे कर्ज | | |
| | भारतीय औद्योगिक वित्तीय व भारतीय औद्योगिक विकास बँक, इंडस्ट्रियल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कार्पोरेशन | ३५०.०० | ४४०.०० |

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील डोंगरी भागात नव्याने उभारण्यात आलेल्या सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीचे गरजेनुसार शासनाचे भाग भांडवल उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न जिल्हा नियोजन मंडळाने केले. भागभांडवलाच्या ४० टक्के पैकी १० टक्के भागभांडवल सभासदांचे असते. समाजाच्या सर्व थरातील कारखान्याचे सभासद असावेत म्हणून दुर्बल घटकांपैकी विशेषत: अनु.जाती व नवबौध्द शेतक-यांना कारखान्याचे भाग भांडवल खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य दिले जाते. तसेच आदिवासी शेतक-यांनाही कारखान्यांचे भाग विकत घेण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे.

सहकारी साखर कारखा-याचे भाग भांडवल खरेदीसाठी मागासवर्गीयांना मिळालेले अर्थसहाय्य [१.४.७४ ते ३१.३.८४ अखेर]

| अ.नं. | योजनेचे नांव | लाभार्थी संख्या | आर्थिक सहाय्य रु.लाखांत |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १] | अनु.जाती/नवबौध्द यांना भाग भांडवल खरेदीसाठी अर्थसहाय्य | १२७ | १.२७ |
| २] | आदिवासींना साखर कारखान्याचे भाग विकत घेण्यासाठी अर्थसहाय्य | ३८ | ०.३८ |

पुणे जिल्ह्यात सन १९७४ ते १९८४ अखेर प्रामुख्याने १] पाणीपुरवठा संस्था [१५] २] दुग्ध विकास [१३९] ३] मच्छिमार [२१] ४] शेती प्रक्रिया [संस्था[१९] ५] शेती सहकारी संस्था [१५] ६] सहकारी पणन संस्था[१३] ७] ग्राहक संस्था [१००] ८] जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या संस्था [६७] ९] सूतगिरणी [१] १०] मजूर सहकारी संस्था[२३९] ११] बलुतेदार सहकारी संस्था[१३] १२] औद्योगिक सहकारी संस्था[१७] या संस्थाना आर्थिक सहाय्य दिले आहे.

आदीवासी क्षेत्रात ६ आदिवासी विकास सहकारी संस्था स्थापन करण्यात आलेल्या असून त्यांना ३३.४० लक्ष रू. इतके आर्थिक सहाय्य देण्यात आलेले आहे. त्यात प्रामुख्याने १] सात वर्षीय बिन व्याजी कर्ज [रू. ११.८४ लाख] २] पंधरा वर्षीय बिन व्याजी कर्ज [रू. ९.२४ लाख] ३] गोदाम, निवासस्थाने बांधणेसाठी [रू. ९.५४ लाख] या योजना आहेत. अशाप्रकारे जिल्ह्यात विविध योजनांवर १.४.७४ ते ३१.३.८४ अखेर एकूण रू. ५१५.७७ लाख खर्च झाला असून ६५७ सहकारी संस्थाना त्याचा लाभ मिळाला व १३,९१० सभासदाना अर्थसहाय्य देण्यात आले.

१९८४–८५ च्या पुढील पाच वर्षामध्ये २ पाणी पुरवठा सहकारी संस्था, १५ मच्छीमार सहकारी संस्था, १० कृषि उत्पन बाजार समित्या, ५ पणन संस्था ६० ग्राहक संस्था, १५० मजूर सहकारी संस्था, ७५ औद्योगिक सहकारी संस्था, १३ बलुतेदार सहकारी संस्था व १० हातमाग संस्थाना अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

## प्रकरण-४ - जल व विद्युत विकास

### जलविकास - मध्यम पाटबंधारे प्रकल्प

कृषि उद्योगाच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या बाबींमध्ये "सिंचाई" ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्यामुळेच स्वातंत्र्यानंतरच्या कालावधीमध्ये प्रत्येक पंचवार्षिक योजनेमध्ये पाटबंधारे प्रकल्पांच्या योजनांना बरेच महत्त्व देण्यात आले. किंबहुना अद्यापही राज्य शासनाकडून राज्यस्तरावरी व जिल्हा नियोजन विकास मंडळाकडून जिल्हा स्तरावर छोट्या व मध्यम पाटबंधारे प्रकल्पांच्या योजनांसाठी भरपूर तरतूद सुचविली जाते.

मोठ्या पाटबंधारे प्रकल्पांची कामे ही राज्य स्तरीय योजना म्हणून वर्गीकृत करण्यात आलेल्या असल्याने मोठ्या प्रकल्पांसाठी राज्यस्तरीय निधीतून तरतूद करण्यात येते. तथापी रु. ५.०० कोटी किंमतीपर्यंतची मध्यम पाटबंधारे प्रकल्पांची कामे तसेच राज्य व स्थानिक क्षेत्रातील लघु पाटबंधाऱ्याच्या योजना या जिल्हा स्तरावरील योजना असून त्यांच्यासाठी जिल्हा स्तरावर तरतूद सुचविली जाते.

पुणे जिल्ह्यात वडिवळे व कासाळसाई या मध्यम पाटंधारे प्रकल्पांची कामे १९८०-८१ मध्ये हाती घेण्यात आली आहेत. नाझरे प्रकल्पाचे काम १९८०-८१ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. प्रकल्पनिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

१] नाझरे :- हा प्रकल्प पुणे जिल्ह्याच्या पुरंधर तालुक्यात असून त्यावर एकूण रू. १२७.२२ लक्ष इतका खर्च करण्यात आलेला आहे. या प्रकल्पामुळे पुरंधर तालुक्यातील २४६० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आलेले आहे. धरणातील पाण्याचा साठा ६३४.०० दश लक्ष घन फूट इतका असतो. धरणाच्या सुरक्षितेसाठी सहाय्यक विहिरी [रिलीफ वेल्स] बांधण्यात येणार आहेत. या प्रकल्पामुळे रानमळा[कोथळे] व घालेवाडी ही दोन गावे पाण्याखाली गेल्याने त्या दोन्ही गावांचे पुनर्वसित करण्यात आलेले असून पुनर्वसित गावात विहिरी, शाळा, समाजमंदिर, अंतर्गत रस्ते जोडरस्ते इत्यदि नागरी सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

२] वडिवळे ता. मावळ :- हा प्रकल्प पुणे जिल्ह्याच्या मावळ तालुक्यात हाती घेण्यात आला असून त्याचा अंदाजपत्रकी खर्च रू. ५१९.४८ लक्ष इतका आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर ३८८७ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊ शकेल. पाण्याचा साठा १२९८ दश लक्ष घन फूट होणार असून ११४७.६८ दश लक्ष घन फूट पाण्याचा नियोजित वापर केला जाणार आहे.

या प्रकल्पावर आतापर्यंत रु. ३०२.१८ लक्ष [३१.३.८५ पर्यंत] इतका खर्च झालेला असून नदीच्या पात्रातील गाभा भरावयाचे काम चालू असून भरावाचे काम

७० टक्के झाले आहे. पुनर्वसन व भूसंपादनाचे काम चालू आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ३८८७ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. त्याचा लाभ मावळ तालुक्यातील १४ गावांना मिळणार आहे.

३] कासारसाई :- हा प्रकल्प मुळशी तालुक्यात हाती घेण्यात आलेला असून त्याचा अंदाजपत्रकी खर्च रु. २७०.०० लक्ष इतका होईल. प्रकल्प पूर्ण होण्यामुळे ३०३६ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येईल. मुळशी तालुक्यातील कासारसाई या गावाजवळील नाल्यावर हा पूल हाती घेण्यात आला आहे. प्रकल्पाचे काम ऑक्टो. ८१ मध्ये सुरु झाले असून आतापर्यंत त्यावर रु. ४०.३३ लक्ष खर्च झाला आहे. हा प्रकल्प १९८६ मध्ये पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे. प्रकल्पातील पाण्याचा साठा १२.६२ दश लक्ष घनफूट असलेला असून पाण्याचा उपयुक्त साठा १२.६२ दश लक्ष घनफुट असेल. हे धरण मातीचे असून त्याची उंची २९.८९ मीटर व लांबी ११८२ मीटर असेल. प्रकल्पाचा लाभ मुळशी तालुक्यातील कासारसाई, नेरे, जांभे, मारुंजी, हिंजवडी व माण या सहा गावांना व मावळ तालुक्यातील चांदखेड व दारुंब्रे या दोन गावाना मिळणार आहे.

## विद्युत विकास

शेती व औद्योगिक उत्पादन वाढविण्यासाठी तसेच सामाजिक व आर्थिक विकास साधण्यासाठी विद्युत क्षेत्राचे महत्त्व लक्षात घेवून जिल्हा नियोजन व विकास मंडळाने विद्युत विकास कार्यक्रमास अग्रक्रम दिला आहे.

विद्युत विकास कार्यक्रमात प्रामुख्याने ग्रामीण विद्युतीकरण, सर्वसामान्य विकास, हरिजन वस्त्यांचे विद्युतीकरण या योजना येतात.

अ] ग्रामीण विद्युतीकरण :- पुणे जिल्ह्यातील १५०३ गावांपैकी ६७० गांवांमध्ये मार्च १९७४ पर्यंत विद्युतीकरण करण्यात आले होते. व त्याचे शेकडा प्रमाण फक्त ४४ टक्के होते. ग्रामीण विद्युतीकरणाचा प्रत्येक तालुक्याचा अनुशेष [back log] लक्षात घेवून प्रत्येक तालुक्यातील ५ ते १० गावांचे विद्युतीकरण दरवर्षी करण्याचे धोरण ठरविण्यात आले. त्यामुळे ३१.३.८४ पर्यंत दौंड, बारामती, पुरंधर, शिरुर व पुणे शहर या तालुक्यातील १०० टक्के गावांचे विद्युतीकरण झाले आणि इंदापूर, जुन्नर, हवेली आंबेगाव, खेड व मावळ या तालुक्यांचे विद्युतीकरण ३१.३.८४ पर्यंत ८० ते ९९ टक्के इतके करण्यात आले.

१९८२-८३ या वर्षी पुणे जिल्ह्यातील १९७१ खानेसुमारीप्रमाणे असलेल्या गावांचे १०० टक्के विद्युतीकरण मार्च. १९८५ पर्यंत करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तालुका व वर्षनिहाय विद्युतीकरण झालेली गावे दाखविणारा तक्ता सोबत जोडला आहे.

शेतीपंपास वीज कनेक्शन देणे या कार्यक्रमाखाली ३१.३.१९७४ पर्यंत जिल्ह्यात २०२७३ पंपांना कनेक्शने देण्यात आली होती. ३१.१२.८४ अखेर जिल्ह्यात एकूण ४५१८९ पंपांना गेल्या दहा वर्षात म्हणजे एप्रिल १९७४ ते डिसेंबर १९८४ या कालावधीत वीज कनेक्शने देण्यात आली. शेतीपंपाचे विद्युतीकरण हा २० कलमी कार्यक्रमाचा एक भाग असल्याने विशेष घटक योजनेखाली १८२ लाभार्थींना प्राधान्याने कनेक्शने देण्यात आली. "गरीबीविरुध्दच्या कार्यक्रमाखाली विहिरी बांधणे या योजनेखाली पूर्ण झालेल्या ३८ विहिरीवरील पंपांनाही प्राधान्याने कनेक्शने देण्यात आली.

शेतीपंपांप्रमाणेच पिण्याच्या नळपाणी पुरवठा योजनांनाही गेल्या तीन वर्षात प्राधान्याने वीज कनेक्शने देण्यात आली. त्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ व संबंधित कार्यान्वयन अधिका-यांमध्ये जिल्हा नियोजन विकास मंडळाने समन्वय साधला व तो कार्यक्रम यशस्वी केला. त्याचे श्रेय जिल्हा नियोजन विकास मंडळास दिल्यास वावगे होणार नाही. तालुकानिहाय व वर्षवार विद्युत पंप कनेक्शने दाखविणारा तक्ता सोबत जोडला आहे.

## <u>हरिजन वस्त्यांचे विद्युतीकरण</u>

ग्रामीण विद्युतीकरण कार्यक्रमाखाली ज्या गावांचे विद्युतीकरण करण्यात आलेले आहे. अशा सर्व गावांतील हरिजन वस्त्यांचे विद्युतीकरण करण्यात आले आहे. तथापी हरिजन वस्त्यांचे पुन्हा सर्वेक्षण करण्याचे काम महाराष्ट्र वीज मंडळाने हाती घेतलेले असून त्याकरिता जिल्ह्यातील तहसिलदार व गटविकास अधिकारी यांचेकडून माहिती मागविण्यात आली आहे.

सर्वसामान्य विकास या योजनेखाली महाराष्ट्र राज्य वीज मंडळामार्फत ट्रान्सफॉर्मर्स बसविणे, वाड्याचे विद्युतीकरण, रस्त्यावरील दिवे लावणे इत्यादि कामे केली जातात.

ग्रामीण विद्युतीकरणाचा तालुकवार प्रगति दाखविणारा तक्ता क्र. १६

| अ. क्र. | तालुका | १९७१ च्या जनगणनेप्रमाणे पूर्वीची संख्या | ३१-३-७४ पर्यंत विद्युतीकरण झालेली संख्या | टक्के | उरणाऱ्या गावांची संख्या | ३१-३-७४ रोजी शिल्लक गावे | ७४-७५ | ७५-७६ | ७६-७७ | ७७-७८ | ७८-७९ | ७९-८० | ८०-८१ | ८१-८२ | ८२-८३ | ८३-८४ | ३१-३-८४ अखेर विद्युतीकरण झालेली गावे संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बारामती | ६४ | ४९ | ७६ | | १३ | ५ | — | — | २ | ७ | ८ | | | — | — | ६४ | १०० |
| २ | भोर | १६२ | ६० | ३५ | | १२६ | ९ | ३ | ४ | ५ | ९ | ३ | २१ | १० | ९ | १५ | १२९ | ८० |
| ३ | दौंड | ६६ | ३८ | ५८ | | २८ | ४ | १ | २ | ३ | १ | २१ | ३ | २ | ५ | ४ | ६६ | १०० |
